RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक २(३)] मंगळवार, जानेवारी १६, २०१८/पौष २६, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ११

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.—** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत (कारखान्याकडून करांऐवजी ठोक रकमेच्या स्वरूपात अंशदान देण्यासंबंधी) नियम,१९६१ यांचे निरसन करण्याकरिता अधिनियम. .. .. .. .. .. | १-२ |

दिनांक १५ जानेवारी २०१८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“ महाराष्ट्र शासन राजपत्रात ”** दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत (कारखान्याकडून करांऐवजी ठोक रकमेच्या स्वरूपात अंशदान देण्यासंबंधी) नियम, १९६१ याचे निरसन करण्याकरिता अधिनियम.**

१९५९ चा ३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत (कारखान्याकडून करांऐवजी ठोक रकमेच्या स्वरूपात अंशदान देण्यासंबंधी) नियम, १९६१ याचे निरसन करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** आता, भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत (कारखान्याकडून करांऐवजी ठोक रकमेच्या स्वरूपात अंशदान देण्यासंबंधी) नियम (निरसन) अधिनियम, २०१७, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याचे कलम १२५ वगळणे.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याचे कलम १२५ वगळण्यात येईल. १९५९ चा ३.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १७६ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १७६ च्या, पोट-कलम (२) मधील, खंड (सत्तावीस) वगळण्यात येईल.

निरसन व व्यावृत्ती.

४. (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत (कारखान्याकडून करांऐवजी ठोक रकमेच्या स्वरूपात अंशदान देण्यासंबंधी) नियम, १९६१, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) मुख्य अधिनियमाचे कलम १२५ वगळण्यात आले असले आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत (कारखान्याकडून करांऐवजी ठोक रकमेच्या स्वरूपात अंशदान देण्यासंबंधी) नियम, १९६१ निरसित झाले असले तरीही, त्या अनुषंगाने करण्यात आलेले किंवा निष्पादित करण्यात आलेले करार हे, त्या करारात नमूद करण्यात आलेल्या कालावधीकरिता विधिग्राह्य असतील आणि नंतर संपुष्टात येतील :

परंतु,—

(एक) जर करार अंमलात असतानाच्या कालावधीत पंचायत, मुख्य अधिनियमानुसार आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांनुसार कोणतेही नवीन कर लादील, किंवा

(दोन) जर भोगवटादार आपल्या जागेत कोणत्याही नवीन इमारतीचे बांधकाम करील किंवा कोणत्याही विद्यमान इमारतीमध्ये पूर्ण फेरबदल करील,

तर, त्याबाबतीत स्वतंत्रपणे कर, बसविण्यात येईल व तो गोळा करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.